Exh. 1

# अहमदनगर येथील मे.मुख्य न्याय दंडाधिकारी साहेब, अहमदनगर

यांचे कोर्टात....

SCC 8915/2024

एस.सी.सी. नं. /२०२४

फिर्यादी

**तापस निमाई बिश्वास**
वय-४५ वर्षे, धंदा – व्यवसाय,
रा.देवकर गल्ली, माळीवाडा, अहमदनगर
अहमदनगर
**मो.नं.९५९५७७७४६९**

आरोपी

**रितु किरण थापा**
वय ४४ वर्षे, धंदा – व्यवसाय
रा.प्लॉट नं.३९, स.नं.३४७/८, समिर नगर,
फकीरवाडा, अहमदनगर
मो.नं. 8308103677

**फिर्याद – निगोशिएबल इनस्ट्रूमेंट ॲक्टचे कलम 138 अन्वये –**

**याकामी फिर्यादी कळवितात ते खालीलप्रमाणे**

| | | |
|---|---|---|
| १. | चेक देणाराचे नांव | रितु किरण थापा |
| २. | चेक नंबर, रक्कम व दिनांक | चेक नं.५२६२४३, रक्कम रु.१,५०,०००/- दि.०२/०५/२०२४ |
| ३. | आरोपीचे बँकेचे नाव | स्टेट बँक ऑफ इंडिया |

| | | |
|---|---|---|
| ४. | फिर्यादीचे बँकेचे नाव | कॅनरा बँक शाखा अहमदनगर |
| ५. | चेक बँकेत भरल्याची तारीख | २५/०७/२०२४ |
| ६. | चेक **न वटता** परत आल्याची तारीख व कारण | २६/०७/२०२४<br>"Refer to Drawer" |
| ७. | नोटीस पाठविल्याची तारीख | २३/०८/२०२४ |
| ८. | नोटीस/इंटिमेशन मिळाल्याची तारीख | २८/०८/२०२४ |
| ९ | कोणत्या पोलीस स्टेशनच्या हददीत गुन्हा घडला. | कोतवाली पोलीस स्टेशन, अहमदनगर |

**<u>याकामी फिर्यादी कळवितो ते खालीलप्रमाणे</u>** –

१) फिर्यादी यांचा सिध्दीविनायक इंटरप्रायजेस या नावाने आयुर्वेदीक औषधांचे दुकान कपिलेश्वर मंदीराजवळ, माळीवाडा, अहमदनगर या ठिकाणी आहे. आरोपीचे ब्युटी पार्लरचे शॉप असल्याने आरोपी व आरोपीचे पती यांचे फिर्यादीच्या दुकानात येणे जाणे होते. त्यातुन आरोपीमध्ये व फिर्यादीमध्ये मैत्रिचे व विश्वासाचे संबंध निर्माण झाले. त्यानंतर आरोपी व आरोपीचे पती फिर्यादीकडून उधारीने माल नेवू लागले व परत उशिराने मालाची रक्कम अदा करु लागले. त्याद्वारे आरोपीने फिर्यादीचा विश्वास संपादन केला.

२) फिर्यादीचा आरोपीवर असलेल्या मैत्रीच्या व विश्वासाच्या संबंधातुन तसेच आरोपीचे पती भारतीय लष्करात नोकरीस असल्याचे सांगितले असल्यामुळे फिर्यादीने आरोपीस दिलेल्या उधारीवरच्या मालाची ताबडतोब मागणी केली नाही व आरोपीने देखील ताबडतोब रक्कम जमा केली नाही.

३) दरम्यान सन २०२२ पर्यंत आरोपीने फिर्यादीचे सिध्दीविनायक इंटरप्रायजेस मधुन Ointment Anti Aging, Aloe Gel, Aloe Cream, Feshwal Kit, Golap Jal, Noni Hair Color, Tonar Soap, Tab Skin Glow, Face Mask, Anti Dandruff Shampoo, Kesh Win Shampoo, Brest Fit Cream, Femi Tite Cream, Creck Waye Cream इ. आयुर्वेदिक औषधे उधारीवर नेले व त्यामधील काही रक्कम फिर्यादीस अदा केली व उर्वरित रक्कम आजतागायत दिलेली नाही. दरम्यान फिर्यादीने काही महिन्यानंतर पैशाची मागणी केली असता आरोपीने आज देतो उद्या देतो असे देऊ दिलाऊची भाषा केली. फिर्यादीचा आरोपीवर असलेल्या संबंधापोटी विश्वास ठेवून आरोपीने दिलेल्या वायद्यावर विश्वास ठेवत गेले.

४) वर नमुद उधारीवर घेतलेल्या मालास मोठा कालावधी झाल्याने फिर्यादीने आरोपीस रकमेसाठी तगादा केला असता आरोपीने आरोपीचे खाते असलेल्या स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेचा चेक नं.५२६२४३, रक्कम रु.१,५०,०००/- दि.०२/०५/२०२४ रोजीचा चेक फिर्यादीचे सिध्दीविनायक एंटरप्रायजेस या नावाने सही करुन दिला व सदरचा चेक मी सांगेल तेव्हा तुमचे बँक खात्यामध्ये वटण्यासाठी भरा, सदरचा चेक निश्चित वटेल असा विश्वास व भरवसा आरोपीने फिर्यादीस दिला.

५) आरोपीचे शब्दावर विश्वास ठेवून फिर्यादीने सदरचा चेक स्विकारला व आरोपीने सांगितल्याप्रमाणे सदर चेक फिर्यादीचे खाते असलेल्या कॅनरा बँक शाखा अहमदनगर येथे दि.२५/०७/२०२४ रोजी वटण्यासाठी भरला असता सदरचा चेक "Refer to Drawer" असा शेरा मारुन दि.२६/०७/२०२४ रोजीचे मेमोसह फिर्यादीचे बँकेने फिर्यादीस परत केला. त्यामुळे फिर्यादीस सदर चेकची रक्कम मिळू शकली नाही.

६) अशाप्रकारे आरोपीने फिर्यादीस देय असलेल्या रकमेचा दिलेला वर नमुद चेक न वटता परत आल्याने फिर्यादीस आरोपीने दिलेल्या चेकची रक्कम मिळालेली नाही. वास्तविक पाहता, आरोपीने फिर्यादीस दिलेला चेक वटेल याची कायदेशीर व नैतिक जबाबदारी आरोपीची होती व आहे. असे

असतानाही आरोपीने फिर्यादीस फसविण्याच्या दृष्ट हेतुने जाणीवपुर्वक न वटणारा चेक देवून फिर्यादीची फसवणूक केली आहे. त्यामुळे फिर्यादीस आरोपीने दिलेल्या चेकची रक्कम मिळू शकली नाही.

७) फिर्यादीने तारीख दि.२३/०८/२०२४ रोजी आरोपीस निगोशिएबल इन्स्ट्रमेंट ॲक्ट कलम १३८ प्रमाणे रजिस्टर पोस्टाने ॲड. संदीप अशोक शेंदुरकर, अहमदनगर यांचे मार्फत रजिस्टर पोस्टाने नोटीस पाठवून आरोपीकडे चेकच्या रक्कमेची मागणी केली असता सदर नोटीस आरोपीस दि.२८/०८/२०२४ रोजी मिळूनही आरोपीने नोटीसीतील नमुद १५ दिवसाचे मुदतीत आणुन दिलेली नाही. अशाप्रकारे सदरील आरोपीने इंडियन निगोशिएबल इन्स्ट्रूमेंट ॲक्टचे कलम १३८ अन्वये गुन्हा केलेला असल्यामुळे फिर्यादीने आरोपी विरुद्ध सदरची फिर्याद मे. कोर्टात दाखल केलेली आहे.

८) <u>फिर्यादीस कारण</u> :- सदरील आरोपीस चेक न वटल्याबाबतची दि.२३/०८/२०२४ रोजीची नोटीस आरोपीस दि.२८/०८/२०२४ रोजी मिळूनही १५ दिवसांत फिर्यादीची चेकची रक्कम आणून दिली नाही तेव्हा प्रथम घडले.

९) <u>कोर्ट फि स्टॅम्प व अधिकार</u> :- सदरील फिर्यादीस योग्य तो कोर्ट फि स्टॅम्प लावलेला असून सदरील गुन्हा घडले ठिकाण हे कोतवाली पोलिस स्टेशन, अहमदनगर हद्दीमध्ये येत असल्यामुळे सदरची फिर्याद चालविण्याचा या मे.कोर्टास पूर्ण अधिकार आहे.

१०) <u>फिर्यादीची विनंती</u> :-

अ) सदरील आरोपीस इंडियन निगोशिएबल इन्स्ट्रूमेंट ॲक्टचे कलम १३८ अन्वये जास्तीत जास्त कठोर शिक्षा ठोठावण्याचा हुकूम व्हावा.

ब) आरोपीस चेकचे रकमेच्या दुप्पट दंड ठोठावण्यात येऊन सदर दंड रकमेतून फिर्यादीस चेकची रक्कम अदा करण्याचा हुकूम व्हावा.

क) सदर फिर्यादकामी फिर्याद दुरुस्तीची फिर्यादीस परवानगी असावी.

ड) न्यायास व हकीगतीस अनुसरुन योग्य त्या दादी देण्यात याव्यात.

येणेप्रमाणे फिर्यादीची फिर्याद असे.

दिनांक :- १८/०९/२०२४

अहमदनगर

फिर्यादी

**<u>या कामी फिर्यादीतर्फे साक्षीपुरावा खालीलप्रमाणे:-</u>**

१) फिर्यादी स्वतः

२) मा.शाखा व्यवस्थापक अथवा माहितगार इसम, कॅनरा बँक अहमदनगर.

३) मा.शाखा व्यवस्थापक अथवा माहितगार इसम, स्टेट बँक ऑफ इंडिया मुख्य शाखा अहमदनगर.

४) फिर्यादकामी जास्त साक्षीपुरावा लागल्यास देण्याची परवानगी असावी.

# सक्षिप्त फौ. ख. नं.८९१५/२०२४

## निशाणी १ वरील आदेश

फिर्याद, त्या सोबतची सर्व कागदपत्र तसेच फिर्यादीचे शपथपत्र यांचे अवलोकन केले. फिर्यादीतर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. फिर्यादीने परक्राम्य लेख अधिनियम १८८१ चे कलम १३८ (Negotiable Instruments Act, 1881) अन्वये आरोपीविरुध्द प्रस्तुतची केस चालविणेसंबंधी प्रथमदर्शनी केस असल्याचे दर्शविलेले आहे. त्यामुळे प्रस्तुत केसमधील आरोपीस परक्राम्य लेख अधिनियम १८८१ चे कलम १३८ अन्वयेच्या अपराधाबद्दल समन्स काढण्यात यावे.

फिर्यादीने प्रोसेस व इतर संबंधीत बाबींची पूर्तता करावी. समन्स परतीचा पुढील दिनांक / /२०२४ नेमणेत आला आहे.

मा.सर्वोच्च न्यायालय यांनी दामोदर एस. प्रभू विरुध्द सय्यद बाबालाल, ए.आय.आर.२०१० सुप्रिम कोर्ट १९०७ या न्याय निर्णयामध्ये दिलेल्या मार्गदर्शक तत्तवानुसार आरोपी विरुध्द समन्स पाठविण्यात यावे.

IRSHAD MOHMADRAFIK NAIKWADI

Digitally signed by IRSHAD MOHMADRAFIK NAIKWADI
Date: 2025.01.13 18:13:58 +0530

दिनांक – १३/०१/२०२५
अहमदनगर

**(ई.मो.नाईकवाडी)**
अति.मुख्य न्यायदंडाधिकारी
(न्यायालय क्र.०७), अहमदनगर.